**शपथेवर पुढील सरतपास श्री शिकारे प्रतिनिधी पार्टी क्र. ०२ (१) तर्फे :—**

०६. शपथपत्र **नि.क्र. यु—५** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये कागदपत्र यादी नि. यु—३ सोबत अनु. क्र. ०१ वरील दोषारोप पत्राची प्रत मला दाखविली, अनु. क्र. ०२ वरील दि. ३१/०५/२०२१ रोजीचा अहवाल मला दाखविले, सदर कागदपत्रास अनुक्रमे **नि. यु—६ व यु—७** देण्यात आली.

०७. आता मला मी प्रकरणामध्ये कागदपत्र यादी नि. यु—३ सोबत अनु. क्र. ०७ वरील माझे मयत पतीने दि. १०/१२/२०१२ रोजी कारण मिमांसा पत्राला दिलेल्या उत्तराची प्रत मला दाखविली सदर प्रतीला **नि. यु—८** देण्यात आली.आता मला मी प्रकरणामध्ये कागदपत्र यादी नि. यु—३ सोबत अनु. क्र. ०८ वरील सेवा बडतर्फी आदेशाची प्रत मला दाखविली त्यास **नि. यु—९** देण्यात आले.

**पुढील सरतपास पूर्ण झाला :**

**उलटतपास श्री. यु. व्ही. देशपांडे अधिवक्ता पार्टी नं. ०१ तर्फे** :

०८. हे म्हणणे खरे आहे की कोणत्याही कर्मचा—याला काम करण्यासाठी तो शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की नोकरीवर रूजू होण्यापर्वी कर्मचा—याला त्याची वैद्यकीस चाचणी करून घेणे आवश्यक आहे.

हे म्हणणे खरे आहे की उपदानाची रक्कम व भविष्य निर्वाह निधीची रक्कम मला मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की सामनेवाला कडून आता मला काहीही रक्कम घेणे नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे पतीला का बडतर्फ केले याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. माझे पती आजारी होते हे दर्शविण्यासाठी मी अभिलेखावर वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले नाही०८.. हे म्हणणे खरे आहे की आजारी व्यक्ती ज्या डॉक्टरकडे उपचार घेतो तो डॉक्टर त्याला औषधे लिहून देतो व भरती करून घेतल्यास तशे रेकॉर्ड हॉस्पीटलला मेन्टेन केले जाते. हे म्हणणे खरे नाही की मी कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे पती आजारी नव्हते म्हणून कोणतेही दस्त सादर केले नाही. हे म्हणने खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण झाला.**

**फेरतपास काही नाही**.

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०१.०१.२०२६.